MCAER
कृषि परिषद

# महाराष्ट्र कृषी शिक्षण व संशोधन परिषद,

**१३२/ब, भांबुर्डा, भोसलेनगर, पुणे - ४११ ००७.**

ई मेल- edn_mcaer@rediffmail.com दूरध्वनी क्र.- ०२०-२५५२८६८८

संकेतस्थळ- www.mcaer.org

सत्यमेव जयते
महाराष्ट्र शासन

जा.क्र. मकृप/शिक्षण-१/१२२५/३१८/१८३४ दि. २४ जून,२०२५

## परिपत्रक

**विषयः- कृषी पदवी अभ्यासक्रमाच्या थेट दुसऱ्या वर्षातील प्रवेश प्रक्रिया २०२५-२६ भारतीय कृषी अनुसंधान परिषदेच्या सहाव्या अधिष्ठाता समितीच्या शिफारशीनुसार कृषी पदवी अभ्यासक्रमाच्या अंमलबजावणीबाबत.**

राज्यातील कृषी विद्यापीठांतर्गत कृषी तंत्रनिकेतन मधून ३ वर्षाचा, इंग्रजी माध्यमातील कृषी तंत्रनिकेतन पदविका अभ्यासक्रम उत्तीर्ण असलेल्या पात्र विद्यार्थ्यांना कृषी विद्यापीठातील कृषी पदवी अभ्यासक्रमाच्या थेट दुसऱ्या वर्षात प्रवेश देण्यात येतात. याबाबतची प्रवेश प्रक्रिया विषयक माहिती पुस्तिका २०२५-२६ हया कार्यालयाकडून तयार करण्यात आलेली आहे. यानुसार राज्य सामायिक प्रवेश परीक्षा कक्षाच्या नियंत्रणाखाली प्रवेश प्रक्रिया राबविण्यात येत आहे.

सदर प्रवेश प्रक्रियेंतर्गत प्रवेश घेऊ इच्छिणाऱ्या सर्व विद्यार्थ्यांना या परिपत्रकाद्वारे अवगत करण्यात येते की, राज्यातील चारही कृषी विद्यापीठांमध्ये जुलै,२०२४ पासून भारतीय कृषी अनुसंधान परिषदेच्या सहाव्या अधिष्ठाता समितीच्या शिफारशींनुसार अभ्यासक्रमाची अंमलबजावणी करण्यात येत आहे. त्यामुळे सन २०२५-२६ हया शैक्षणिक वर्षामध्ये कृषी पदवीच्या थेट दुसऱ्या वर्षात प्रवेश घेणाऱ्या विद्यार्थ्यांना सहाव्या अधिष्ठाता समितीने शिफारशित केलेला अभ्यासक्रम पूर्ण करणे अनिवार्य आहे, याची सर्व संबंधितांनी नोंद घ्यावी.

**(यशवंत साळे)**
**संचालक (शिक्षण)**

प्रतः-

(१) मे. विबास टेक्नोलॉजी, पुणे
यांना सूचित करण्यात येते की, सर्व संबंधितांना अवगत होण्याच्या दृष्टिकोनातून त्यांनी सदरचे परिपत्रक कृषी परिषदेच्या संकेतस्थळावर उपलब्ध करून द्यावे.

(२) कुलसचिव, महात्मा फुले कृषी विद्यापीठ, राहुरी, जि.अहिल्यानगर / डॉ. पंजाबराव देशमुख कृषी विद्यापीठ, अकोला / वसंतराव नाईक मराठवाडा कृषी विद्यापीठ, परभणी / डॉ.बाळासाहेब सावंत कोंकण कृषी विद्यापीठ, दापोली जि.रत्नागिरी

(३) मा. आयुक्त तथा सक्षम प्राधिकारी, राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्ष, ८ वा मजला, न्यु एक्सलसियर बिल्डींग, ए. के. नायक मार्ग, फोर्ट, मुंबई ४००००१
यांना विनंती करण्यात येते की, प्रवेशोच्छुक विद्यार्थ्यांना अवगत होण्याच्या दृष्टिकोनातून राज्य सामायिक प्रवेश परीक्षा कक्षाच्या संकेतस्थळावर सदरचे परिपत्रक उपलब्ध करून देण्याच्या संबंधितांना सूचना व्हाव्यात.

(४) मा.महासंचालक यांचे स्वीय सहायक, कृषी परिषद, पुणे